Exh 11/B

रेग्युलर दिवाणी दावा क्र.58/2026

**मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगाव**

श्री सुशांत दत्तात्रय दबडे ... वादी

विरुध्द

१) मा. मुख्याधिकारी, वडगाव नगरपरिषद व इतर ... प्रतिवादी

**यातील प्रतिवादी क्रमांक 1 व 2 तर्फे सदरच्या दाव्याचे कामी लेखी विधान (Written Statement) व तुर्तातुर्त मनाई अर्जास लेखी म्हणणे असे की,**

1. सदरचा दावा व तुर्ता- तुर्त मनाई अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाहीत. त्यामुळे ते खर्चासह फेटाळण्यात यावेत.

2. दाव्याच्या परिच्छेद क्र. १ मधील दावा मिळकतीचे वर्णन आणि संपूर्ण मजकूर हा खोटा व चुकीचा असल्याने प्रस्तुत प्रतिवादी क्र. स्पष्टपणे नाकारत आहेत.

3. दाव्याच्या परिच्छेद क्र. २ मधील मजकूर अपुरा आहे.

4. दाव्याच्या परिच्छेद क्र. ३ मधील मजकूर की, दावा मिळकत यातील वादी यांनी...... परवानगी घेऊनच करत आहेत हा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

5. दाव्याच्या परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर की, दावा मिळकतीमध्ये वादी जो व्यवसाय करतात .......... अशी कोणतीही बाब वादी करत नाहीत हा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असून प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

6. दाव्याच्या परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर की, थोडक्यात दावा मिळकतीमध्ये वादीची........ धमकी देऊन निघून गेले हा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असल्याने प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

Order- Read and Record

Sd/-
C. J. J. D. Peth Vadgaon

No. of Corrections on this page Nil 04/04/26

8. दाव्याच्या परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर की, प्रतिवादी यांचे सदरचे सर्व कृत्य....... उपासमारीची वेळ येणार आहे हा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असल्याने प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

9. दाव्याच्या परिच्छेद क्र. ७ मधील मजकूर की, आणि म्हणूनच प्रतिवादी यांनी............ वादीस प्रस्तुतचा दावा गुदरावा लागत आहे हा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा असल्याने प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

NOTARY
Adv.
J. A. Jadhav
ADVOCATE & NOTARY
KOLHAPUR DIST.
REGD. NO. 15048
Exp. Date
10/10/202.
GOVT. OF INDIA

10. दाव्याच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये वादीने नमूद केलेले दाव्याचे कारण (Cause of Action) हे प्रतिवादीच्या विरोधात अस्तित्वात नाही.

11. दाव्याच्या परिच्छेद क्र. ९ ते १२ मधील केलेली दाव्याची आकारणी, कोर्ट फी आणि अधिकारक्षेत्राबाबतचा मजकूर हा खोटा व चुकीचा असून बेकायदेशीर आहे.

12. दाव्याच्या व तुर्तातूर्त मनाई अर्जातील परिच्छेद क्र. 13 मध्ये वादीने मागितलेली कोणतीही दाद प्रतिवादीच्या विरुद्ध मिळण्यास पात्र नाहीत.

13. तूर्तातूर्त मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

14. सदरचे दाव्याचे कामी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 304 प्रमाणे द्यावी लागणारी दावा पूर्व नोटीस यातील वादी यांनी न दिल्याने प्रस्तुत चा दावा चालण्यास पात्र नाही. प्रस्तुतचा दावा प्रथमदर्शनी चालणेस पात्र नसल्याने तुर्तातूर्त मनाई सारखी दाद यातील वादी यांना मागता येणार नाही.

15. वडगाव नगरपरिषदेकडील उपलब्ध असलेल्या नगरपालिका मालकीच्या स्थावर मालमत्ता पैकी इमारती, दुकान गाळे व खुल्या जागेचे नगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 92 व महाराष्ट्र नगरपालिका स्थावर मालमत्ता हस्तांतरण नियम 1983 च्या तरतुदीप्रमाणे भाड्याने दिल्या जातात. स्थायी समिती ठराव नंबर 60 दिनांक 30/12/2017 अन्वये वडगाव नगर परिषदेकडे उपलब्ध खुल्या जागा व दुकान गाळे भाड्याने देणे बाबत मान्यता दिलेली आहे. सदरचा ठराव जनरल कौन्सिल सभेत कायम करण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणे दिनांक 11/6/2018 रोजी दैनिक महासत्ता मधून वडगाव नगर परिषदेने दुकान गाळे व खुल्या जागा दिनांक 1/4/2018 ते 31/3/2021 या कालावधी करता लिलावाने भाड्याने देणे बाबत जाहीर नोटीस काढण्यात आलेली होती. सदर स्थानिक नोटीस बोर्डावर व इतर प्रमुख नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या होत्या त्यानंतर दिनांक 29/6/2018 रोजी लिलावाच्या अटी व शर्ती सर्वांसमोर वाचून दाखवून इमारती, दुकान गाळे व खुल्या जागेचे भाड्याने देणे बाबत जाहीर लिलाव करण्यात आलेला आहे. त्यानंतर जनरल कौन्सिल ठराव नंबर 65 दिनांक 26/2/2021 अन्वये पुढील तीन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानंतर ही पुन्हा प्रशासकीय ठराव नंबर-288 दिनांक- 14/3/2024 अन्वये पुढील 4 वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

16. कसबा वडगाव येथील सिटी सर्वे नंबर 518 ही वडगाव नगर परिषदेच्या मालकीची मिळकत आहे. वडगाव नगर परिषदेचे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेमार्फत खुली जागा व्यवसायाकरता यातील वादी यांना योग्य त्या अटी व शर्ती वरती जाहीर लिलावाने भाड्याने देण्यात आलेली आहे. सदरच्या खुल्या जागेवरती येथील वादी यांनी विनापरवाना व बेकायदेशीर गाळाचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम पूर्णता बेकायदेशीर आहे.

17. सदरच्या बेकायदेशीर बांधिव गाळ्यामध्ये आवश्यक ते व्यवसाय परवाने न घेता श्री बबलू हारून खाटीक व श्री हुसेन हारून खाटीक हे बेकायदेशीररित्या मटन विक्रीचे व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच त्याबाबत नगरपरिषदेकडे दिनांक 06/1/2026 व दिनांक 16/2/2026 रोजी लेखी तक्रारी प्राप्त झाल्या. सदर मिळकतीच्या जवळच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. सदर मटन दुकानामुळे पुतळा परिसरामध्ये दुर्गंधी पसरलेली असून रस्त्याने येण्या जाणाऱ्या लोकांना त्याचा त्रास व उपद्रव होत आहे. त्याबाबत अनेक नागरिकांनी नगरपरिषदेकडे तोंडी तक्रारी केलेल्या आहेत. महापुरुषांच्या पुतळ्याशेजारी मटन दुकान चालू राहिलेने नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. वस्तुतः वडगाव शहरांमध्ये नगरपरिषदेमार्फत स्वतंत्र मटन मार्केटची सोय करून देण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी श्री हुसेन व बबलू खाटीक यांचे मटन विक्रीचे दुकान आहे. लोक भावनेचा विचार करून व वस्तुस्थितीची चौकशी करून नगरपरिषदेमार्फत सदरचे सि.स.नंबर 518 मधील मटन विक्रीचा

व्यवसाय बंद करणे बाबत वादी व व्यवसायचालक यांना दिनांक-16/1/2026, 04/02/2026 व 24/2/2026 नोटीसी अन्वये कळविलेले असून सदरच्या नोटिसा पूर्णतः कायदेशीर आहेत.

18. वडगाव नगरपरिषदेचे उत्पन्न वाढण्याच्या करिता नगर परिषदेमार्फत खुली जागा व्यवसाया करिता वादी यांना देण्यात आलेली होती. सदरचे खुले जागेवरती येथील वादी यांनी विनापरवाना व बेकायदेशीर गाळ्याचे बांधकाम केलेले आहे. सदरचे बांधकाम हे पूर्णतः अनधिकृत व बेकायदेशीर असल्याने सदरचे बांधकाम काढून टाकणे आवश्यक होणार आहे. त्याबाबत नगरपरिषदेमार्फत स्वतंत्र कारवाई करण्यात येणार आहे.

19. नगरपालिकेने लिलावाच्या वेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास बाधा आल्यास, प्रशासनाला योग्य ती कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे. वादीने सादर केलेले FSSAI प्रमाणपत्र (दि. २५.०२.२०२६) हे केवळ खाद्य सुरक्षा मानकांसाठी असून, ते नगरपरिषदेच्या मालमत्तेवरील ताब्याबाबत अंतिम हक्क प्रदान करत नाही.

20. यातील वादी यांनी लिलावाच्या अटी व शर्ती यांचा भंग करून विनापरवाना गाळ्याचे बांधकाम केलेले आहे. तसेच आवश्यक ते सर्व परवाने न घेता मटन विक्रीचा व्यवसाय चालू केलेला आहे. त्यामुळे यातील वादी हे स्वतः कायदा मोडून कृती करत आहेत. त्यामुळे त्यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे.

21. वादी हे स्वच्छ हाताने कोर्टात आलेले नाहीत. त्यांनी मटेरियल फॅक्ट्स कोर्टापासून लपवलेल्या आहेत. वादी यांचे मागणीप्रमाणे मनाई सारखा हुकूम झाल्यास प्रतिवादी तर्फे करण्यात येत असलेल्या कायदेशीर कारवाई मध्ये अडथळा निर्माण होणार आहे.

22. वादी यांचा दावा मुदतीत नाही. सकृत तर्शनी केस व न्यायाचे समतोलत्व प्रतिवादींचे बाजूने आहे.
23. वादी यांनी तूर्ता तूर्ता मनाई अर्जामध्ये मागितलेल्या दादी ह्या पूर्णतः बेकायदेशीर असल्याने त्याप्रमाणे दादी मागणीचा त्यांना अधिकार व हक्क नाही.

NOTARY GOVT. OF INDIA Adv. J. A. Jadhav ADVOCATE & NOTARY KOLHAPUR DIST. REGD. NO. 15048 Exp. Date 10/10/202

No. of Corrections on this page
04/04/26

24. सदरचे कामी व्यवसाय चालक श्री बबलू हरून खाटीक व हुसेन हरून खाटीक हे आवश्यक पार्टी आहेत. त्यामुळे सदर दाव्यास नॉन जॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टी या तत्वाचा बाध येतो.

25. सदरचा दावा व तुर्ता- तुर्त मनाई अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाहीत. त्यामुळे ते खर्चासह फेटाळण्यात यावेत.

NOTARY Adv. J. A. Jadhav ADVOCATE & NOTARY KOLHAPUR DIST. REGD. NO. 15048 Exp. Date 10/10/202 GOVT. OF INDIA

**26. सबब विनंती की (Prayer):**

अ] वादीचा दावा (Exh. 1) व तुर्तातूर्त मनाई अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावेत.
ब] आवश्यक झालेस कैफियत व म्हणणे दुरुस्त करणेस किंवा ज्यादा कैफियत व म्हणणे देण्यास परवानगी असावी.
क] अन्य न्यायाचे हुकूम याच कामी प्रतिवादी यांचे वतीने व्हावेत.

ठिकाण: पेठ वडगाव
दिनांक: 04/04/2026

मुख्याधिकारी
वडगांव नगरपरिषद, वडगांव
[ प्रतिवादी नंबर 1 व 2 ]

**प्रतिज्ञा (Verification)**

मी प्रतिवादी नंबर 1 व 2 वडगाव नगरपरिषद वडगाव तर्फे मुख्याधिकारी श्री सुमित सुभाषराव जाधव वय वर्ष-- धंदा- नोकरी रा. पेठ वडगाव तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

वरील कैफियत व म्हणण्यातील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

ठिकाण: पेठ वडगाव
दिनांक: 04/04/2026

मुख्याधिकारी
वडगांव नगरपरिषद, वडगांव
[ प्रतिवादी नंबर 1 व 2 ]

**शपथपत्र**

...of Correction on this page Nil 04/04/26

मी प्रतिवादी नंबर 1 व 2 वडगाव नगरपरिषद वडगाव तर्फे मुख्याधिकारी श्री सुमित सुभाषराव जाधव वय वर्ष-- धंदा- नोकरी रा. पेठ वडगाव तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर शपथेवर कथन करतो की,

वरील कैफियत व म्हणण्यातील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

ठिकाण: पेठ वडगाव

दिनांक: 04/04/2026

मुख्याधिकारी

वडगांव नगरपरिषद, वडगांव

[ प्रतिवादी नंबर 1 व 2 ]

**<u>प्रतिज्ञा (Verification)</u>**

मी प्रतिवादी नंबर 1 व 2 वडगाव नगरपरिषद वडगाव तर्फे मुख्याधिकारी श्री सुमित सुभाषराव जाधव वय वर्ष-- धंदा- नोकरी रा. पेठ वडगाव तालुका हातकणंगले जिल्हा कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

वरील शपथपत्रातील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

ठिकाण: पेठ वडगाव

दिनांक: 04/04/2026

मुख्याधिकारी

वडगांव नगरपरिषद, वडगांव

[प्रतिवादी नंबर 1 व 2]

NOTARY
Adv. J. A. Jadhav
ADVOCATE & NOTARY
KOLHAPUR DIST.
REGD. NO. 15048
GOVT. OF INDIA

BEFORE ME

Advocate & Notary

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL